आधुनिक शहरातील घडामोडी
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
e Paper
वर्ष 4थे
www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 25/09/2026 METRO CITY VRUTANT
संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 204 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# पंतप्रधान नरेंद्र मोदी 24 ऑक्टोबरला बारामती दौऱ्यावर

## शरद पवारांकडून तयारीचा आढावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**बारामती : बारामतीकरांची उत्सुकता वाढविणारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा बारामती दौरा अखेर निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. येत्या 24 ऑक्टोबर रोजी पंतप्रधान मोदी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान परिसरात उभारण्यात आलेल्या 'प्रेरणास्थळा'चे उद्घाटन करणार आहेत. या दौऱ्यात विद्या प्रतिष्ठानमध्ये उभारण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) संस्थेची पाहणी तसेच संस्थेच्या कामकाजाचे सादरीकरणही पंतप्रधानांसमोर होण्याची शक्यता आहे.**



या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी बुधवारी नक्षत्र गार्डन येथील प्रेरणास्थळाची पाहणी केली. त्यानंतर विद्या प्रतिष्ठानच्या मुख्यालयात संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन दौऱ्याच्या तयारीचा आढावा घेतला. पंतप्रधानांच्या स्वागताची व्यवस्था, उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन आणि अन्य आवश्यक बाबींवर या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. या बैठकीला युवा नेते युगेंद्र पवार, विश्वस्त विठ्ठल मणियार, प्रताप पवार, कृषी विकास प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. निलेश नलवडे, विश्वस्त किरण गुजर आणि सचिव नीलिमा गुजर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत प्रेरणास्थळाच्या उद्घाटनाच्या तयारीबरोबरच विद्या प्रतिष्ठानमधील एआय संस्थेच्या उपक्रमांबाबतही चर्चा झाल्याचे समजते.

विद्या प्रतिष्ठान परिसरात उभारण्यात आलेले प्रेरणास्थळ तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या स्मृती आणि विचारांना समर्पित आहे. शांतता, समता आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा या संकल्पनेमागील प्रमुख उद्देश आहे. येथे भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यासह विविध महापुरुषांच्या चित्रांद्वारे त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा परिचय करून देण्यात आला आहे.

राजर्षी शाहू महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सयाजीराव गायकवाड, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, यशवंतराव चव्हाण आणि शारदाबाई पवार यांना या प्रेरणास्थळात प्रेरणास्थान म्हणून स्थान देण्यात येणार आहे.

त्यामुळे हे स्थळ सामाजिक समता, परिवर्तन आणि मानवतावादी विचारांचे केंद्र ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा दौरा बारामतीतील त्यांच्या यापूर्वीच्या भेटीनंतरचा पुढील दौरा ठरणार आहे. यापूर्वी 14 फेब्रुवारी 2015 रोजी मोदी यांनी विद्या प्रतिष्ठान तसेच माळेगाव येथील कृषी विज्ञान केंद्राला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी विविध कार्यक्रमांसह शेतकरी मेळाव्यात सहभाग घेतला होता.

# दुष्काळी परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यातील इतर भागांप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, शेतकऱ्यांना थेट मदत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**



मुख्यमंत्री फडणवीस यांनी बार्शी तालुक्यातील धानोरे येथे नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार राजेंद्र राऊत, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने, बार्शी चे तहसीलदार एफ.आर. शेख यांच्यासह संबंधित अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात सरासरीच्या सुमारे 50 टक्केच पाऊस झाला असून, खरीप हंगामातील जवळपास सर्व पिकांचे नुकसान झाले आहे. धानोरेसह बार्शी तालुक्याच्या या परिसरात सुमारे 90 हजार हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकांचे 100 टक्के नुकसान झाले आहे. दुष्काळी परिस्थितीकडे शासन गांभीर्याने लक्ष देत असून, शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यासाठी लवकरच शासन निर्णय (जीआर) काढण्यात येईल. मदत थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, अन्नधान्य तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काचा प्रश्न याबाबत शासन लवकरच निर्णय घेणार आहे. आगामी काळात रब्बी हंगामासाठी पाणी उपलब्ध झाले, तर त्या अनुषंगाने शेतकऱ्यांना आवश्यक मदत करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

उजनी धरणातील उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याबाबतही शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येणार आहे. पालकमंत्री गोरे व आमदार राऊत यांनी सोलापूर जिल्ह्यात पाणी आणण्यासाठी मांडलेल्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन सकारात्मक असून, त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# रस्त्यांची कामे तातडीने सुरु करा! नगरसेविका ऐश्वर्या तरस यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : प्रभाग क्रमांक 16 मधील विविध रस्त्यांच्या विकासकामांना गती देण्यासाठी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस आणि युवा नेते राजेंद्र तरस यांनी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत विविध रस्त्यांची पाहणी केली. नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि सुकर वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या पाहणीदरम्यान रस्त्यांच्या कामांचा आढावा घेण्यात आला.**

या पाहणीवेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागाचे उपसंचालक खोब्रागडे, स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील शिंदे तसेच स्थापत्य व नगररचना विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.यावेळी कृष्ण हॉटेल ते लोढा बेलमांडो सर्व्हिस रोड, मुकाई चौक ते शिंदे पेट्रोल पंप रोड, रुणाल गेटवे–रुणाल स्पेशिओ परिसर, विकासनगर मुख्य रस्ता तसेच लोटस लक्ष्मी ते नाल्यालगत बापदेवनगरकडे जाणाऱ्या डी.पी. रोडची पाहणी करण्यात आली. या रस्त्यांच्या कामांसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन आवश्यक त्या उपाययोजना आणि पुढील कार्यवाहीबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

प्रभागातील रस्त्यांच्या कामांमध्ये अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन कामे लवकरात लवकर सुरु करण्यावर यावेळी भर देण्यात आला. तसेच रस्त्यांच्या विकासकामांचा दर्जा, सुरक्षितता आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन नियोजन करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

प्रभागातील पायाभूत सुविधांचा विकास आणि नागरिकांना दर्जेदार रस्ते उपलब्ध करून देणे ही आपली प्राथमिकता आहे. यासाठी संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करुन रस्त्यांची कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी स्पष्ट केले.



# गणराया दुष्काळावर मात करण्याची शक्ती दे-सचिन अहिर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर दुष्काळाचे संकट आले आहे. गणराया दुष्काळावर मात करण्याची शक्ती दे अशी मागणी मी गणपती बाप्पाच्या चरणी आज केली आहे असे विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी सांगितले.**

गुरुवारी, (दि.24) भोसरी येथील सीआयइ ऑटोमेटिव्ह इंडिया लि. या कंपनीच्या गणपतीची आरती सचिन अहिर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी आमदार महेशदादा लांडगे, शिवसेना उपनेते व ज्येष्ठ नगरसेविका सुलभा उबाळे, सीआयइ कंपनीचे अधिकारी विनायक कळसकर, निवृत्ती बच्छाव, बाळासाहेब पाटील, प्रशांत शर्मा, कामगार संघटनेचे पदाधिकारी कृष्णदेव थोरात, दीपक अरगडे, सुभाष जमादार, दत्तात्रय धावडे, ज्ञानेश्वर कळमकर आदी उपस्थित होते.



यानंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना सचिन अहिर म्हणाले की, महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट आहे. दुष्काळाची राज्य सरकारने योग्य दखल घेतली आहे.

केवळ अहवालावर अवलंबून न राहता मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेत आहेत. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दुष्काळा विषयी तीन दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अहवाल प्राप्त होताच मुख्यमंत्री याविषयी निर्णय जाहीर करतील. दुष्काळा विषयी विशेष अधिवेशन घेण्याचा प्रस्ताव सरकारकडे नाही.

पुढील दीड ते दोन महिन्यात अधिवेशन होईल त्या अधिवेशनात दुष्काळ विषयावर आमदार आपल्या भावना मांडू शकतील. त्यापूर्वीच सर्व सुरळीत होईल.

हे संकट नैसर्गिक आहे. काही ठिकाणी धरणे भरली आहेत, तर काही ठिकाणी पिकं करपली आहेत. शेतकऱ्यांना मदत करणे आवश्यक आहे.

सरकार शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करण्याच्या भूमिकेत आहे. सर्वच शेतकऱ्यांना वाटते की, माझे म्हणणे मुख्यमंत्र्यांपर्यंत गेले पाहिजे. म्हणून मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री स्वतः शेतकऱ्यांशी बांधावर जाऊन संवाद साधत आहेत.

पक्षाच्या वतीने जालना, अमरावती, नागपूर येथे चारा छावण्या सुरु केल्या आहेत. प्रथम शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्ष मदत पोहोचवून मग चारा छावण्या सुरु केल्या जातील. इतर पक्ष तसेच सामाजिक संस्थांनी देखील चारा छावणी सुरु करण्यासाठी योगदान दिले आहे असेही विधान परिषद उपसभापती सचिन अहिर यांनी सांगितले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 22/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मनपा उद्यान विभागातील अनागोंदी कारभाराविरोधात 'आप' युवा आघाडी आक्रमक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मुख्यालयाच्या अगदी शेजारी सुरु असलेल्या एका खाजगी बांधकाम प्रकल्पासाठी तब्बल 52 जुन्या आणि मोठ्या झाडांची बेकायदेशीरपणे व अत्यंत निर्घृण कत्तल करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. बिल्डरच्या फायद्यासाठी वृक्षसंवर्धन विभागातील अधिकारी महेश गारगोटे व कर्मचाऱ्यांनी संगनमत करून झाडांचे वय आणि संख्या कागदपत्रांवर कमी दाखवल्याचा आरोप करत आज आम आदमी पार्टी (आप) युवा आघाडीच्या वतीने रविराज काळे यांच्या नेतृत्वात मनपा उद्यान विभागातील अधिकाऱी महेश गारगोटे यांना'पैशांचे झाड' भेट देऊन अभिनव आणि तीव्र निषेध नोंदवण्यात आला.**



या प्रकरणी आम आदमी पार्टीच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन सादर करून दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

1) खाजगी बिल्डरच्या बांधकामात अडथळा ठरणाऱ्या 52 जुन्या वृक्षांची कत्तल करण्यासाठी उद्यान विभागातील अधिकाऱ्यांनी झाडांचे वय आणि संख्या यामध्ये फेरफार करून वृक्ष प्राधिकरणाची दिशाभूल केली आहे.

2) या वृक्षतोडीसंदर्भातील अधिकृत माहिती व कागदपत्रे देण्यास अधिकारी टाळाटाळ करत असून, महापालिकेचा कारभार बिल्डरच्या कार्यालयातून चालतोय की काय, असा संताप व्यक्त केला जात आहे. 3) ज्या ना-हरकत दाखल्याच्या (NOC) आधारे सदर प्रकल्पाला बांधकाम परवानगी दिली आहे, ती तातडीने रद्द करण्यात यावी आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबवावा. 4) मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व महाराष्ट्र वृक्षतोड कायद्यानुसार, कर्तव्यात कसूर करणाऱ्या व बेकायदेशीर वृक्षतोडीला खतपाणी घालणाऱ्या उद्यान मुख्य अधिक्षक महेश गारगोटे आणि इतर कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करून त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत फौजदारी खटला दाखल करावा. उद्यान व वृक्षसंवर्धन विभाग हा पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नसून केवळ बिल्डर धार्जिणी भूमिका घेऊन स्वतःचे उदरभरण करण्यासाठीच कार्यरत आहे का, असा सवाल करत रविराज काळे व 'आप' युवा आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उद्यान विभागातील अधिकाऱ्यांना 'पैशांचे झाड' भेट देऊन प्रशासनाच्या भ्रष्ट कारभाराचा पर्दाफाश केला.

यावेळी आम आदमी पार्टी व युवा आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष ऋषिकेश कानवटे,युवक शहराध्यक्ष विकी पासोटे , योगेश गायकवाड आणि पर्यावरणप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्मार्ट सिटीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी पदी मनोज सेठिया यांची नियुक्ती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी (एबीडी) पदी शहर अभियंता मनोज सेठिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्मार्ट सिटी संचालक मंडळाची बैठक चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे पार पडली. त्यावेळी नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात आला.**

शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आणि नागरिकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. माजी शहर अभियंता मकरंद निकम यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर ही निवड करण्यात आली आहे.शहराच्या विकासाला अधिक गतिशीलता प्रदान करणाऱ्या या बैठकीस आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड, शहर अभियंता तथा नवनियुक्त सह मुख्य कार्यकारी अधिकारी (एबीडी) मनोज सेठिया, संचालक प्रदीप भार्गव, तसेच यशवंत भावे यांच्यासह सर्व सन्माननीय अधिकारी व संचालक उपस्थित होते.

या नवीन नियुक्तीमुळे पिंपरी-चिंचवडमधील सुरु असलेल्या स्मार्ट सिटी प्रकल्पांच्या कामांना अधिक वेग येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 25/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मिस पुणे फेस्टिव्हलची आकृती श्रृंगारे मानकरी!

**>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पुणे : 38 व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये संपन्न झालेल्या प्रतिष्ठेच्या 'मिस पुणे फेस्टिव्हल' स्पर्धेत आकृती शृंगारे ही प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. श्रावणी पवार आणि पूर्वा भिडे या रनरअप ठरल्या. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती तरिता शंकर आणि पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते विजेत्यांना मुकुट प्रदान करण्यात आला.**



डेंटल वर्ल्डचे डॉ. केदार व पल्लवी पाठक यांनी दंत चिकित्सा करुन बेस्ट स्माईल श्रावणी पवार ही विजेती ठरली. डिजिटल टास्क फोर्स तर्फे घेतल्या गेलेल्या रीलस स्पर्धेतुन सायबर सेफ क्वीन साठी सोनिया साठेची निवड केली गेली. अश्विन कोडगुले यांनी फोटोशूट करुन मिस फोटोजेनिकसाठी आकृती श्रींगारेची निवड केली. बेस्ट टॅलेंटसाठी संज्योत राऊलवारची निवड झाली. तर प्रेक्षकातून चिठ्ठ्यांतून मतदान घेऊन मिस फेव्हरेट म्हणून सोनिया साठे या तरुणीचे नाव घोषित केले गेले.

इंदिरा इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर शान मेहेंदळे, प्रख्यात अभिनेत्री सानिया चौधरी, अभिनेता आणि मॉडेल अजित शिधये आणि फॅशन कोरिओग्राफर आणि दिग्दर्शक जुई सुहास यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

टी एस प्रस्तुत मिस पुणे फेस्टिवल 2026 चे दिग्दर्शन जुई सुहास तर ग्रूमिंग व कोरिओग्राफर म्हणून फाल्गुनी झेंडे यांनी काम पाहिले. संयोजिका सुप्रिया ताम्हाणे यांनी ही माहिती दिली.

वारसा या संकल्पनेवर आधारित 15 अंतिम स्पर्धक मुलींनी आत्मविश्वासपूर्ण रॅम्प वॉक, स्वतःची ओळख, प्रश्न उत्तरे अशा विविध फेऱ्या पार केल्या. यामधून 3 विजेत्या तरुणींची निवड झाली.

या 15 स्पर्धक तरुणींसाठी 15 दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले, फोटोशूट , दंत चिकित्सा, ब्युटी ट्रीटमेंट, नेल आर्ट, फिटनेस तसेच सायबर सुरक्षा ,हेरिटेज वॉक, अशा अनेक गोष्टींचा ही यात समावेश होता.

टी एस बाय तरिता शंकर हा कॉस्मेटिक ब्रँड यंदा मिस पुणे फेस्टिवलसाठी मुख्य प्रायोजक होते.

# संभवामि युगे युगेचा प्रत्ययकारी प्रयोगाला हाऊसफुल प्रतिसाद

**>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पुणे – श्रीकृष्णचरित्राचे, या चरित्रातील विविध प्रसंगांचे दर्शन नृत्य-नाट्याच्या माध्यमातून घडविणारे संभवामि युगे युगे हे अतिशय प्रत्ययकारी सादरीकरण बुधवारी रसिकांच्या हाऊसफुल्ल गर्दीत सादर झाले आणि पूर्णपुरुष मानले जाणाऱ्या या अवतारकार्याचे सर्वश्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध झाले.**



पुणे फेस्टिव्हल अंतर्गत संस्कृती बालगुडे यांच्या संकल्पनेतून साकार झालेले, त्यांनीच दिग्दर्शित तसेच अभिनित केलेले संभवामि युगे युगे हे नृत्यनाट्य यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भरगच्च प्रेक्षागृहाने अक्षरशः डोक्यावर घेतले. पायात व्याधबाण घुसलेला श्रीकृष्ण स्वतःच आपल्या अवतारकार्याची प्रेरणा, आवश्यकता आणि अपरिहार्यता प्रेक्षकांसमोर ठेवतो, या प्रसंगातून सुरु झालेले हे नृत्यनाट्य फ्लॅशबॅक तंत्राने बालकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे दर्शन घडवत कंसवध, राधेसोबतचे हळवे, नाजुक क्षण दर्शवत योगेश्वर श्रीकृष्णापर्यंतचा प्रवास सांगणारे होते. द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग, कृष्णशिष्टाई अयशस्वी होणे, युद्धाचा निर्णय, गीतोपदेश, भीष्म-द्रोण-कर्ण-दुर्योधनवधाचे प्रसंग, गांधारीचा शाप आणि यादवांचा वंशनाश असे टप्पे घेत पुन्हा पायात बाण घुसलेल्या श्रीकृष्णापर्यंत वर्तुळ पूर्ण करताना प्रेक्षक भारावून गेले होते.

पण ते तिथेच थांबले नाही. तर यदा यदा हि धर्मस्य...या वचनाची पूर्तता करण्यासाठी मी पुन्हा अवतार धारण करेन, इथपर्यंत प्रेक्षकांना घेऊन गेले. मानवी जीवनातील आशानिराशा, महत्त्वाकांक्षा, सत्तालालसा, कुटीलता, नैतिक अनैतिकतेचे अर्थ, जय पराजयाच्या संकल्पना...सगळ्यांचे काल व परिस्थितीसापेक्ष विश्लेषण मांडणारे हे नृत्यनाट्य प्रेक्षकांना अंतर्मुख करणारेही होते.

या प्रयोगाला पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू, पुणे पुस्तक महोत्सवाचे राजेश पांडे, संजय बालगुडे, संजीवनी बालगुडे, सचिन साळुंके, सचिन आडेकर, अतुल गोंजारी, श्रीकांत कांबळे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. नृत्यनाट्यातील सर्व कलाकार, तंत्रज्ञ, मदतनीसांचा या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये सहनिर्मिते केदार सोमण, सूत्रधार व निर्मिती व्यवस्थापक निखिल निगडे, संगीत दिग्दर्शक तन्मय भिडे व ऋतुराज साठे, संगीत संयोजक विवेक वनारसे, प्रकाश योजनाकार तेजस देवधर, केशभूषाकार शीतल पळसांडे, नृत्यनाट्याच्या दिग्दर्शक व नृत्यदिग्दर्शक तसेच संकल्पना, सहनिर्मात्या, प्रमुख अभिनेत्री संस्कृती बालगुडे, विद्या दिढे, रिचा बापट, तितली घोटक, नक्षत्रा कुलकर्णी, स्पृहा कुलकर्णी यांचा समावेश होता.

संस्कृती बालगुडे म्हणाल्या, 'या हाऊसफुल प्रतिसादाबद्दल मनापासून आभार व्यक्त करते. या प्रयोगाचे यश प्रेक्षकांच्या प्रतिसादावरच अवलंबून आहे कारण भरतनाट्यम नृत्यशैलीच्या माध्यमातून सादर होणारे हे नृत्यनाट्य आहे. पण याची रचना कल्पकतेने केल्याने ते छोट्यांना आणि मोठ्यांनाही सहज समजणारे आहे. कार्यक्रमास प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968